केंद्र शासनाच्या “भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष साहाय्य योजना २०२६-२७”, या योजनेच्या भाग-१ अंतर्गत निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४१४ (ई नस्ती क्र.१६८६९६२)/भूमापन
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक : ३१ ऑगस्ट २०२६.

संदर्भ : १. महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्र.ई-१६८६९६२/भूमापन, दि.०७.०७.२०२६.
२. वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२६/प्र.क्र.२२/अर्थबळ, दि.०४.०८.२०२६.

प्रस्तावना -

केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य २०२६-२७ भाग-१ या योजनेंतर्गत राज्य शासनाच्या भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते. सदर योजनेच्या भाग- १ अंतर्गत भूमि अभिलेख्यांचे आधुनिकीकरण आणि डिजीटायजेशनसाठी केंद्र शासनाच्या मान्यतेस अनुसरून वित्त विभागाने महसूल व वन विभागास संदर्भ क्र.२ येथे नमूद शासन निर्णयान्वये रु.३३.०० कोटी निधी मंजूर करून पहिल्या हप्त्याचा उपलब्ध करून दिलेला रु.२१.७८ कोटी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

भूमि अभिलेख विभागासाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात रु.३३.०० कोटी रकमेचे ३०० जी.एन.एस.एस.रोव्हर्स, कंट्रोलर्स व १०० पोस्ट प्रोसेसिंग सॉफ्टवेअरची खरेदी करणेकामी संदर्भ क्र.१ येथे नमूद शासन निर्णय दि.०७.०७.२०२६ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

२. केंद्र शासनाच्या “भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष साहाय्य योजना २०२६-२७”, या योजनेच्या भाग-१ अंतर्गत मंजूर रू.३३.०० कोटीपैकी रु.२१.७८ कोटी निधी भूमि अभिलेख विभागासाठी ३०० जी.एन.एस.एस.रोव्हर्स, कंट्रोलर्स व १०० पोस्ट प्रोसेसिंग सॉफ्टवेअरची खरेदी करणेकामी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वितरीत करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

३. प्रस्तुत योजनेसंदर्भातील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना व कार्यपध्दतीनुसार खर्च करणे अनिवार्य असेल.

४. सदरचा निधी विहित कालमर्यादेत खर्च करणे बंधनकारक आहे. तसेच, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राथम्याने शासनास सादर करावे.

५. सदर प्रयोजनार्थ होणाऱ्या रू.२१.७८ कोटी (अक्षरी रुपये एकवीस कोटी अष्ठ्याहत्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेचा खर्च हा “मागणी क्र.जी-८, ४५१५, इतर ग्राम विकास कार्यक्रम यावरील भांडवली खर्च, ००, १०३, ग्रामीण विकास, (०१) केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत ५० वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज, (०१) (०१) सास्की योजनेअंतर्गत भूमि अभिलेख्यांचे आधुनिकीकरण आणि डिजीटायझेशन (कार्यक्रम), ५०, इतर खर्च, संगणक सांकेतांक क्रमांक ४५१५” या लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ या वर्षाच्या मंजूर आर्थिक तरतुदीमधून भागविण्यात यावा.

६. उपरोक्त निधी अधिदान व लेखा कार्यालयातून आहरित करण्यासाठी सहाय्यक संचालक, ऋण व हमी सनियंत्रण कक्ष, वित्त विभाग यांना आहरण व संवितरण अधिकरी तसेच सह सचिव, अर्थबळ, वित्त विभाग यांना नियंत्रक अधिकरी म्हणून वित्त विभागाने घोषित केले आहे. सबब, सदर शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येणाऱ्या निधीकरिता आहरण व संवितरण अधिकारी यांनी कोषागाराकडे देयके सादर करून आहरित करून या योजनेच्या संबंधित खात्यामध्ये वर्ग करण्यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. याबाबतच्या खर्चमेळाची कार्यवाही कार्यासन भूमापन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी करावी. सदरचे वितरण हे सशर्त स्वरूपाचे आहे.

७. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील दि.०४.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून निर्गमीत करण्यात येत आहे.

८. संदर्भाधीन शासन निर्णयातील व मार्गदर्शक सुचनांमधील अन्य अटी व शर्ती कायम राहतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८३११५००२१८४४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.08.31 15:02:01 +05'30'

(संजय बनकर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

९. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

१०. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-९/व्यय-१०/कोषा प्रशा-५/ऋण व हमी/अर्थ-१८/प्रशा-४), मंत्रालय, मुंबई.

११. निवडनस्ती (भूमापन).